दैनिक सकाळ - दि. 27/5/2016



सोलापूर : सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक को-ऑप. असोसिएशन, सोलापूर यांच्या वतीने गुरुवारी आदर्श बँक पुरस्कार स्वीकारताना समर्थ बँकेचे पदाधिकारी व अधिकारी.

# आदर्श बँक पुरस्काराचे थाटात वितरण

**सोलापूर, ता. २६ :** सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक को-ऑप. असोसिएशन, सोलापूर यांच्या वतीने चांगले काम करणाऱ्या बँकांचा आदर्श बँक पुरस्कार देऊन आज सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर आदर्श मॅनेजर पुरस्कारही देण्यात आला.

शिवस्मारक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमासाठी आमदार बबनराव शिंदे, माजी आमदार सुधाकर परिचारक, जिल्हा उपनिबंधक बी. टी. लावंड, राज मिणियार, मोहन दाते, कल्याणराव काळे उपस्थित होते. श्री. लावंड यांनी या वेळी उपस्थित असलेल्या बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. बँकांनी वसुलीत सातत्य ठेवावे. वसुलीसाठी चांगल्या अधिकाऱ्यांची निवड करण्याची सूचनाही श्री. लावंड यांनी केली.

समर्थ बँक, लोकमंगल बँक, सांगोला बँक, निशिगंधा बँक, पंढरपूर, सोलापूर जनता सहकारी बँक, विकास बँक, मनोरमा बँक, विद्यानंद बँक, शिवशक्ती बँक, बार्शी, शरद नागरी बँक, सोलापूर, कृषी सेवा अर्बन बँक, कोळा, लक्ष्मी बँक, माढेश्वरी बँक, माढा, सद्गुरू गहिनीनाथ बँक, अकलूज या बँकांना आदर्श बँक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समर्थ बँकेचे व्यवस्थापक उमेश थोब्बी यांना आदर्श मॅनेजर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.